**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यू मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

ॲफि.जन.१ / परिपत्रक / २०२२–२३/१६०

२३ एप्रिल, २०२२

परिपत्रक:

**विषय : महाविद्यालयाचे संलग्नीकरणाचे संगणकीकरण करणेबाबत**

संलग्नता विभागाच्या उपरोक्त विषयाच्या संदर्भातील परिपत्रक क्र. ॲफि.जन.१ / परिपत्रक /२०२२–२३/५३, दिनांक ०६ एप्रिल, २०२२ ला अनुसरून सर्वांना कळविण्यात येत आहे की, सदरील कामाच्या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**या कार्यशाळेला आपल्या विद्यापीठाच्या माननीय कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव संबोधित करणार आहेत.**

| दिनांक | कार्यशाळेचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|
| २८ एप्रिल, २०२२ | पाटकर हॉल, विद्यापीठ आवार, चर्चगेट | **कार्यशाळा नाव नोंदणी**<br>सकाळी १०.३० ते ११.३०<br>**कार्यशाळा**<br>सकाळी ११.३० ते दुपारी ०२.०० |

उपरोक्त कार्यशाळेच्या संदर्भात कळविण्यात येते की, **विद्यापीठाचे संलग्नीत व संचलित महाविद्यालयांये प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य/ विद्यापीठाचे विभागप्रमुख व संगणकाचे ज्ञान असलेला प्राध्यापक/ संगणक तज्ञ प्रतिनिधी** यांनी महाविद्यालयाच्या ओळख पत्रासह कार्यशाळेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी. महाविद्यालयाच्या ज्या कर्मचाऱ्यांकडे सदर काम देण्यात येईल त्यांच्याकडे कायमस्वरूपी हे काम देण्यात यावे, याची कृपया दक्षता घ्यावी.

कार्यशाळेत संबंधीत महाविद्यालयाने महाविद्यालयाची माहिती/अध्यापकांची सर्व माहिती, विद्यार्थी / विषय/ अभ्यासक्रम इत्यादी सर्व माहितीचे संकलन कोणत्या प्रपत्रात व कसे सादर करावे याचा तपशील देण्यात येईल. तसेच निरंतर/ नैसर्गिक संलग्नीकरण /विस्तारीकरणाचे शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिताचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्यासाठीचे प्रशिक्षण सदरील कार्यशाळेत देण्यात येईल. **संबंधीत संलग्नीत महाविद्यालयांना 'लॉग इन आय.डी' व 'पासवर्ड' निर्मल सॉफ्टवेअर स. प्रा. लि. मार्फत देण्यात येईल, याकरिता महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी कार्यशाळेस येताना सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे विनंतीअर्ज आपल्याबरोबर घेऊन यावे.**

या संपूर्ण प्रक्रियेत महाविद्यालयाचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच माहिती सादर करताना माहितीच्या सत्यतेबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

P.S. Wakpainjan

(डॉ. प्रज्ञा वाकपैंजण)
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत – संचालक, मे. निर्मल सॉफ्टवेअर स. प्रा. लि यांना पुढील योग्य कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.

**टीप: महाविद्यालयांनी प्रवास स्वखर्चाने करावा.**

d:\pallavi\affiliation (pallavi)\letter\marathi letter.docx

College Letter Head

---

प्रति,

दिनांक -

संलग्नता विभाग (अतिरिक्त भार),
श्रीमती ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यू मरीन लाईन,
चर्चगेट, मुंबई -४०० ०२०

विषय : संलग्नता विभागाच्या ऑनलाईन प्रक्रीयेसाठीचा (लॉगीन आयडी) मिळणे बाबत.

महोदय,

वरील विषयी विनंती अर्ज सादर करण्यात येतो की, संलग्नता विभागाच्या ऑनलाईन प्रक्रीयेच्या कार्यशाळेसाठी -------------------- महाविद्यालयाचे कुलसचिव/ कक्षाधिकारी/ कर्मचारी ------------------------------------------------ यांना कार्यभार देण्यात आलेला असून, महाविद्यालयाचे (Login Details) यांना देण्यात यावेत. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| महाविद्यालयाची संबंधित माहिती | मराठी / हिंदी | इंग्रजी / in English |
|---|---|---|
| संस्थेचे नाव व पत्ता | | |
| महाविद्यालयाचे नाव | | |
| महाविद्यालयाचा पत्ता | | |
| प्राचार्यांचे नाव | | |
| प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्र. | | |
| महाविद्यालयाचा ई-मेल आयडी | | |

प्राचार्य

सही व शिक्का